RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ६(२)] सोमवार, फेब्रुवारी २, २०२६/माघ १३, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक १३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ फेब्रुवारी, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र शासन कार्यनियमावली.**

क्रमांक शाकानि-२०२४/प्र.क्र.८६(१)/रवका-१.—**ज्याअर्थी**, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी, मुख्यमंत्री यांच्या सल्ल्यानुसार, शासकीय अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक शाकानि-२०२४/प्र.क्र.८६(१)/रवका-१, दिनांक २१ डिसेंबर, २०२४ (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) द्वारे, मंत्र्यांना विभाग किंवा विभागांचे भाग यांचा प्रभार सोपवून त्याद्वारे मंत्र्यांमध्ये शासनाचे कामकाज नेमून दिले होते;

आणि **ज्याअर्थी**, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी, मुख्यमंत्री यांच्या सल्ल्यावरून, श्रीमती सुनेत्रा अजित पवार, मा. उपमुख्यमंत्री यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ हे विभाग सोपविलेले आहेत आणि त्या प्रयोजनासाठी, उक्त अधिसूचनेत सुधारणा करणे इष्ट आहे.

**त्याअर्थी**, आता, महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या नियम ५ च्या तरतुदींस अनुसरून, महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या सल्ल्यावरून, याद्वारे, शासकीय अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक शाकानि-२०२४/प्र.क्र.८६(१)/रवका-१, दिनांक २१ डिसेंबर, २०२४ यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :-

उक्त अधिसूचनेमधील, "श्री. अजित आशाताई अनंतराव पवार, उपमुख्यमंत्री" यांच्याशी संबंधित असणाऱ्या नोंद ३ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल:-

| | | |
|---|---|---|
| "३. | श्रीमती सुनेत्रा अजित पवार,<br>उपमुख्यमंत्री, | राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ.". |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश अग्रवाल,**
शासनाचे मुख्य सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 2nd February, 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA GOVERNMENT RULES OF BUSINESS.

No.ROB-2024/C.R.86(1)/O&M-1.—Whereas, the Governor of Maharashtra has, on the advice of the Chief Minister, *vide* Government Notification, General Administration Department, No.ROB-2024/C.R.86(1)/O&M-1, dated the 21st December 2024 (hereinafter referred to as "the said notification"), allotted amongst the Ministers, the business of the Government by assigning Departments or parts of the Departments to the charge of the Ministers;

And whereas, the Governor of Maharashtra has, upon the advice of the Chief Minister has assigned State Excise, Sports and Youth Welfare, Minorities Development and Aukaf Departments to Smt. Sunetra Ajit Pawar, Deputy Chief Minister and for that purpose, it is expedient to amend the said Notification.

Now, therefore, in pursuance of the provisions of rule 5 of the Maharashtra Government Rules of Business, the Governor of Maharashtra, on the advice of the Chief Minister, is hereby pleased to amend the Government Notification, General Administration Department, No.ROB-2024/C.R.86(1)/O&M-1, dated the 21st December 2024, as follows, namely :—

In the said notification,for entry 3, relating to "Shri Ajit Ashatai Anantrao Pawar, Deputy Chief Minister", the following entry shall be substituted, namely :—

| | | |
|---|---|---|
| "3. | Smt. Sunetra Ajit Pawar,<br>Deputy Chief Minister, | State Excise, Sports and Youth Welfare and Minorities Development and Aukaf.". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH AGGARWAL,
Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.